RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay


International Research Journal
UGC-CARE LISTED

Special Issue, Volume- III

## Challenges of Higher Education in India to Compete with Global Level

July 2021





**Chief Editor:**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor:**
**Dr. Purandhar Dhanapal Nare**
**Principal,**
**Night College of Arts and Commerce,**
**Ichalkaranji**



**Co-Editor:**
**Dr. Madhav. R. Mundkar**



Address:
'Pranav' Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515 (MS)

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

## UGC CARE LISTED JOURNAL

July 2021

Special Issue, Volume-III

On

## *CHALLENGES OF HIGHER EDUCATION IN INDIA TO COMPETE WITH GLOBAL LEVEL*

**Chief Editor**
**Dr. NanasahebSuryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Purandhar Dhanapal Nare**
Principal
Night College of Arts & Commerce, Ichalkaranji.

**Co-Editor**
**Dr. Madhav. R. Mundkar**
Assistant Professor, Head Dept. of Hindi
Night College of Arts & Commerce, Ichalkaranji.

**Editorial Board**
Prof. M. R. Dandekar
Prof. Dr. S. L. Randive
Prof. Dr. C. B. Khandekar
Prof. Dr. D. B. Birnale
Prof. Dr. R. V. Sapkal
Prof. Dr. S. V. Chaple
Prof. S. R. Patankar

**Published by**-Dr. Purandhar Dhanapal Nare, Principal, Night College of Arts & Commerce, Ichalkaranji.

*The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.*

© All rights reserved with the Editors Price:Rs.1000/-

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, July 2021, Special Issue, Volume-III
*"Challenges of Higher Education in India to Compete with Global Level"*

# CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | Envision 2030: Quality Education<br>**Dr. Jagdish G. Kharat** | 1-2 |
| 2 | Morphometric Analysis of Linear Aspects of Sina River Basin, Maharashtra<br>**Sudhakar Pardeshi, Sandip Shinde** | 3-9 |
| 3 | Superior Scientific Knowledge and Humanity in Science Fiction<br>**Dr. Manjusha Y. Dhoble** | 10-12 |
| 4 | Role of Gender in Self Concept and Achievement Motivation among College Students<br>**Dr. Tribhuvan sunil laxman** | 13-16 |
| 5 | Role of Bharat Nirman Yojana In Inclusive Growth<br>**Mr. Hanmant Shahaji Sawant, Dr. Tejswini B. Mudekar** | 17-22 |
| 6 | Gender Inequality in Indian Higher Education – An Overview<br>**Virupaksh R. Khanaj** | 23-28 |
| 7 | Social Realism in Alan Paton's Novel, Cry, the Beloved Country<br>**Dr. U. A. Patil** | 29-30 |
| 8 | A New Normal: Artificial Intelligence In Education<br>**Deepika and Prof Sarika Sharma** | 31-36 |
| 9 | Higher Education in India – Issues and Challenges<br>**Dr. Dhale Gautam Namdev** | 37-41 |
| 10 | Growing Importance of English in India<br>**Dr. Jotiram Gaikwad** | 42-44 |
| 11 | Physical Education and Future Challenges In India<br>**Prof. Ubale Rahul Vasantrao** | 45-47 |
| 12 | A Webometrics Study of Websites of Universities from Karnataka.<br>**Dr.Nilesh Harishchandra Hande** | 48-55 |
| 13 | Higher Education in India: Challenges and Opportunities<br>**Dr. D.B.Karnik** | 56-58 |
| 14 | Multimedia in Teaching English Language in the Global Context<br>**Mr. Bhimrao Shankar Bansode** | 59-61 |
| 15 | Personnel Skills Requirement for Enhanced Library Services in the Higher Education Context<br>**Dr. Khandekar Ganesh Bajirao** | 62-65 |
| 16 | Regional Pattern Andintensity of Higher Education Institutes in South Konkan Region of Maharashtra<br>**R.L.Kore** | 66-69 |
| 17 | Challenges of Higher Education In India to Compete With Global Level<br>**Dr. Shobha Arun Paudmal** | 70-72 |
| 18 | Recent trends in health and Sports science<br>**Dr. Kedare.A.V** | 73-75 |
| 19 | The Influence of Reading Comprehension on Vocabulary Growth using Matthew Effect Model<br>**Amir Prasad Behera** | 76-80 |
| 20 | Challenges of Higher Education in Digitalization Era<br>**Dr. Bhasker Gangadhar Koshidgewar** | 81-83 |
| 21 | A Geographical Study of Ujani Urs<br>**Mr. Dange V. B.** | 84-88 |
| 22 | Foreign Direct Investment in Maharashtra: An Overview<br>**Dr.Sambhaji R. Pagar** | 89-92 |
| 23 | Teachers in education: role and problem<br>**Rahul Bhosale** | 93-95 |
| 24 | John Arden Contemporary British Playwright: Experimental, Innovative and Traditional<br>**Dr. Subhra Rajput** | 96-99 |
| 25 | Education: Basic Legal Aspects<br>**Dr. Suresh G. Santani** | 100-103 |
| 26 | Developing Ethno-Herbal Heritage of a region as Herbal Tourism: Potential and Prospects for Kashmir<br>**Dr. Shahnawaz Ahmad Dar, Tahmeed Ahmad Badam** | 104-118 |
| 27 | Higher Education in Rural India<br>**Dr. Desai M. S.** | 119-121 |
| 28 | A study of correlation between literacy and sex ratio in Satara District<br>**Dr. Sudhakar Koli, Dr. Subhash Chavare, Dr. Abhijit Phate** | 122-125 |
| 29 | Trends and the Development in Indian English Fiction<br>**Mr.Tanaji Sambhaji Deokule** | 126-129 |


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
(Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)



PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

| | | |
|---|---|---|
| 30 | Grade Analysis and Setting of Prime Wellbeing Services in Solapur District<br>**Dr. A. G. Nimase** | 130-134 |
| 31 | Functional Classification of Urban Centers in Solapur Disrict, Apply by Nelson's Model<br>**Dr. S. D. Shinde, Dr. A. V. Pore** | 135-138 |
| 32 | Importance of Forest in Ancient Period<br>**Padma. J** | 139-142 |
| 33 | A Jain Centre of Badami Region<br>**Dr. M. N. Bennur** | 143-145 |
| 34 | Physical Health Status of Elderly People In Urban setting: Case Study<br>**Dr. Vinay K.U** | 146-147 |
| 35 | Human Rights of Dalit Women In India<br>**Dr. Dineshappa Singapur** | 148-149 |
| 36 | Socio-economic study of weekly markets: An assessment of sellers in Sangli district of Maharashtra<br>**Sachin R. Mali, Meena B. Potdar** | 150-154 |
| 37 | व्यावसायिक समाजकार्याचे उद्देश आणि तत्वे<br>**प्रा.डॉ. राहुल यशवंतराव निकम** | 155-158 |
| 38 | इस्लामी तत्त्वज्ञान आणि सूफी संप्रदाय<br>**प्रा. डॉ. एस. एस. मुल्ला , प्रा. एफ. एम. पटेल** | 159-161 |
| 39 | महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा व कर्मचाऱ्यांवरील ताणतणाव एक दृष्टीक्षेप<br>**श्री सिकंदर न पटेल** | 162-163 |
| 40 | समाजभाषाविज्ञान: लघुरुपे व भाषाव्यवहार<br>**प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते** | 164-166 |
| 41 | पंजाबमधील दहशतवाद आणि इंदिरा गांधी<br>***प्रा. कांबळे शिवाजी ईरबा*** | 167-170 |
| 42 | हिंदी दलित कविता में अभिव्यक्त आंबेडकरी विचार-दर्शन ('नीले शब्दों की छाया में' काव्य संग्रह के विशेष संदर्भ में)<br>***डॉ. माधव राजप्पा मुंडकर*** | 171-173 |
| 43 | वैश्विक परिदृश्य में हिन्दी की स्थिति<br>***डॉ.साईनाथ विठ्ठल चपले*** | 174-176 |
| 44 | भारतीय शास्त्रीय संगीतातील आडवळणे<br>**प्रा.डॉ. चंद्रकिरण घटे** | 177-179 |
| 45 | कनवाड गावांतील 'गुनंदा पोल्ट्री फार्म' :एक आर्थिक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा.डॉ.प्रभाकर तानाजी माने** | 180-182 |
| 46 | श्रीरामपूर नगरपालिकेच्या सार्वजनिक सेवा सुविधांच्या उपभोगाविषयाचा अभ्यास<br>***डॉ. मारुती अर्जुन केकाणे*** | 183-186 |
| 47 | कॉम्रेड पी.बी.कडू पाटील यांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर,** | 187-190 |
| 48 | काश्मीरच्या राणीचा जीवनपट रेखाटणारी कादंबरी : रणयोगिनी ले. विजया जहागीरदार<br>**प्रा. डॉ. सतीश गुलाबराव कावळे** | 191-193 |
| 49 | गंदी बात: नारीवाद की बदलती परिभाषा<br>**श्री. संतोष शंकर साळुंके, डॉ. दिलीपकुमार बाबाजी कसबे** | 194-197 |
| 50 | मातृभाषा मराठी आणि भारतीय शिक्षणव्यवस्था<br>**डॉ. संदिप जोतिराम भुयेकर** | 198-200 |
| 51 | वारेला अनुसूचित जनजाति की महिलाओं के अधिकार<br>**सोलंकी मोनिका** | 201-202 |
| 52 | ऑनलाईन शिक्षणाविषयी विद्यापीठ अनुदान आयोगाचे धोरण<br>**प्रा. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ** | 203-208 |
| 53 | परशुराम शुक्ल के काव्य में बाल चेतना ('चिड़िया नीड़ बनाती' के विशेष संदर्भ में)<br>**श्री. लिपारे अजित विठ्ठल** | 209-212 |
| 54 | मैत्रेयीपुष्पा के उपन्यासों में नारी विमर्श (बेतवा बहती रही, 'इदन्नमम' 'चाक', 'झूलानट' और 'अल्मा कबूतरी' के संदर्भ में)<br>**डॉ. मुकेश वसावा** | 213-216 |
| 55 | भारतातील उच्च शिक्षणातील आव्हाणे आणि [illegible]<br>**डॉ. मारोती तुकाराम घटेवाड** | 217-219 |
| 56 | विदर्भाच्या शैक्षणिक वाटचालीत आलेल्या [illegible] एक ऐतिहासिक अध्ययन (ब्रिटिश कालखंडाच्या विशेष संदर्भात)<br>**डॉ. कैलाश फुलमाळी** | 220-222 |


Co-ordinator
IQAC
...Guru Buddhiswami Mahavidyalaya
... 431511 (M.S.)



PRINCIPAL

# समाज भाषा विज्ञान: लघुक्षेत्रे व भाषा व्यवहार

*प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते*
*सहा.प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख,श्री. गुरुबुद्धी स्वामी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पूर्णा.*

**प्रास्ताविक–**

भारत हा बहुभाषिक देश आहे. देशातीलसांस्कृतिक-भौगोलिक विविधता, ऐतिहासिक पार्श्वभूमी, नैसर्गिक संपन्नता, प्राचीन भाषा, परंपरा, विविधधर्म-जाती, वर्गयामुळे भाषाभेद निर्माण झाले आहेत. प्रादेशिक वैविध्य आणि त्याला अनुसरून असणारी सांस्कृतिक वैशिष्ट्ये यामुळे अनेक स्थानिकबोलींची निर्मिती झालेली दिसून येते. याबोलींचा समाजसापेक्ष अभ्यास अतिशय प्रभावी व महत्त्वपूर्ण ठरतो.

**समाजभाषा विज्ञान:**

समाजाभाषाविज्ञान या अभ्यासक्षेत्राचा उदय साधारणपणे सन १९६० नंतर झालेला दिसून येतो. भाषा आणि समाज यांच्यामध्ये असलेल्या संबंधांचा अभ्यास समाजभाषाविज्ञानात केला जातो. भाषा हेसमाज व्यवहाराचे प्रभावी माध्यम आहे. समाजामध्ये सर्वत्र एकाच भाषा भाषेची एकसारखी रूपे आढळत नाहीत. भाषेच्या विविध रुपांमागे सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी असते. भाषा आणि भाषाव्यहाराचा अभ्यास समाजसापेक्ष करावा असा मतप्रवाह उदयास आला.भाषेच्या अभ्यासाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन समाजाभाषाविज्ञानाने दिला. भाषा अभ्यासाचे विकसनशील रूप म्हणून समाजाभाषाविज्ञान या शाखेकडे पहिले जाते.

समाजभाषाविज्ञानही अभ्यास शाखा विकसित होण्यासाठी अनेक भाषा अभ्यासकांचे योगदान लाभले आहे. एडवर्ड सपीर, बैन्जामिन लीवोर्फ, फिशमन, डेल हाईम्स, जॉन गम्पर्झ, विल्यम लेबव्ह इ. अभ्यासकांनी या शाखेचा विस्तार करताना मुलभूत प्रकारची मांडणी केली आहे. भाषा व्यवहार आणि सामाजिक संरचना यात परस्परावलंबित्वाचे नाते असते. लौकिक जीवनात भाषेचा उपयोग व्याकरणिक नियमांनी होत नसून सामाजिक संकेत व संदर्भ भाषिक व्यवहाराच्या मूळाशी असतात. त्यामुळे भाषेचा अभ्यास एका अर्थाने त्या संबधित समाजाचा अभ्यास असतो अशी पारंपारिक भाषा अभ्यासाला छेद देणारी नवी दिशा समाजभाषाविज्ञानाने दिली. भाषा अभ्यासाचा आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन यामुळे अधिक विस्तार पावला. समाजभाषाविज्ञान व मानववंशशास्त्रयांच्या महाय्याने भाषेचा अभ्यास करणाऱ्या प्रणालीला भाषेचे समाजविज्ञान असे म्हणतात. लेबव्ह च्या मते, 'संपूर्ण भाषा विज्ञान हे समाजभाषाविज्ञानचआहे.'

**लघुक्षेत्रे:**

समाजभाषाविज्ञानात'भाषिक भांडार' ही संकल्पना जॉन गम्पर्झ यांनी मांडली आहे. प्रत्येक भाषिक समाजाचे एक भाषिक भांडार असते. विशिष्ट क्षेत्रातील लोक एकत्र येवून विनिमयासाठी ज्या भाषेचा/ बोलीचा प्रयोग करतात त्या सर्वांचा मिळून भाषिक कोश तयार होत. उदा. आरोग्य क्षेत्रात कार्यरत असणारे डॉक्टर, परिचारिका, परिचारक, औषध विक्रेते, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह, आरोग्य क्षेत्राशी संबधित सेवा पुरवणारे उद्योग व व्यवसाय यांची साखळी, औषध निर्मिती करणारे कारखाने या सर्वांचा मिळून एक भाषिक व्यवहाराचा परिसर तयार होतो. या भाषिक परिसरात बोलली जाणारी भाषा त्या परिसरात सातत्याने सहभागी होण्याऱ्या घटकाला अवगत होते, आकलन होते. याभाषिक परिसराबाहेरील त्याच भाषेच्या भाषकाला ती आकलन होईलच असे सांगता येत नाही कारण त्या क्षेत्राच्या दैनंदिन भाषाविनिमयासाठी आवश्यक बाबी संबधित भाषाव्यवहार आलेल्या असतात. उदा. 'ओटी' (OT) या हा शब्दप्रयोग एखादी परिचारिका करते त्यावेळी तिला जो संदेश द्यावयाचा असतो तो संदेश आणि एखादी ग्रामीण वयस्क स्त्रीला झालेला अर्थबोध वेगळा असण्याची शक्यता जास्त असते. कारण ग्रामीण वयस्क स्त्रीच्या आकलनानुसार 'खण-नारळांनी भरावयाची ओटी' हा सामाजिक संदर्भाने ती अर्थ घेईल पण आरोग्य क्षेत्रात कार्यरत असेलेल घटक'ओटी'(OT) या शब्दाचा अर्थ ऑपरेशन थिअटर असा घेतील. म्हणजेचसमाजविशेष, व्यवसायविशेष, आर्थिक सामाजिक स्तर यांचा प्रभाव भाषा आदानप्रदान व अर्थनिश्चितवर होत असतो म्हणून व्यवसाय क्षेत्रनिहाय भाषिक कोश वेगळे असण्याची शक्यता असते. व्यावसायिक गरजांनुसार कोणती भाषिक रूपे वापरायची हे निश्चित होते. यालाच'लघुक्षेत्र'Domain असे म्हणतात.त्यामुळे वेगवेगळ्या लघुक्षेत्रानुसार भाषा वापर हा वेगळा असू शकतो.

मानवी जीवनातील विविध व्यावसायिक क्षेत्रातील काही विशेष शब्दांच्या माध्यमातून लघुक्षेत्रे हीसंकल्पनाअधिक विस्ताराने समजून घेता येईल. समाजात असणाऱ्या विविध क्षेत्रात एकाच शब्दाचा अर्थ वेगवेगळ्या पद्धतीने घेतला जात असतो. व्यवसायपरिभाषा ही या भाषाव्यवहार व अर्थ निर्णयन प्रक्रियेत महत्त्वाची असते. लघुक्षेत्र निहाय प्रातिनिधिक कोश पुढीलप्रमाणे,

Coordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1963

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

**आरोग्यक्षेत्र:**

उपरोक्तविवेचन केल्याप्रमाणे आरोग्य क्षेत्रात दैनंदिन भाषाव्यवहार करणाऱ्या व्यावसायिक घटकांच्या व्यवहार गरजा पूर्ण करण्यासाठी दैनदिन वापरातीलच बहुतांश शब्दाचा वापर केला जातो.पण त्याला सामान्य अर्थाबरोबरच व्यवसायनिष्ठ असा एक अर्थ असतो तो अधिक महत्त्वाचा असतो. आरोग्य क्षेत्र या लघुक्षेत्रातील शब्द यादी पुढीलप्रमाणे सांगता येईल.

रोग, जंतू, आरोग्य, डॉक्टर, नर्स, परिचारिका, अधिपरिचारिका, सिस्टर, ब्रदर, औषध, मेडिसिन, गोळया, टॉनिक, सलाईन, इलाज, निदान, प्याथोलोजी, टेस्ट, डोस, इंजेक्शन, वार्ड, व्ह्याक्सिन, ड्रेसिंग, ओटी, ऑपरेट, डिस्चार्ज, ऑपरेशन, कॅजुअल, ओपीडी, ट्रामा, डिसीजअसे असंख्य शब्द आरोग्यक्षेत्रात वापरले जातात. यातील काही शब्द हे त्या भाषेत व्यवहार भाषिकाला माहित असतात पण सर्वच शब्द सामान्य भाषिकाला अवगत असतीलच असे नाही.

**शिक्षणक्षेत्र:**

शाळा अथवाशिक्षण व्यवस्था ही एक महत्त्वाची सामाजिक संस्था असून समाजातील बहुतांश घटकांचा या क्षेत्राशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध आलेला असतो. असे असले तरी या क्षेत्रात वापरले जाणारे सर्वच सामान्य भाषकाला माहित असतीलच असे नाही. त्याचबरोबर सामान्य भाषाव्यहारात अन्य अर्थासाठी वापरले जाणारे शब्द इथे वेगळया अर्थाने वापरेल्र जातील. याची प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे.

प्रिन्सिपल, प्रिन्सिपल्स, नैदानिक चाचण्या, चाचण्या, सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन, टेस्ट, प्राचार्य, कुलगुरू, प्र.कुलगुरू, रजिस्टर, लेजर, एडमिशन, शिपाई, समीक्षा, सिद्धांत, शिस्त, प्रार्थना, गृहपाठ, वर्गपाठ, संवाद, आभासीवर्ग, परिसंवाद, संदर्भ ग्रंथ, साधनसूची, ग्रंथसूची, संशोधन, क्रमिक पुस्तके, शिशुवर्ग, एलकेजी, युकेजी, प्राथमिक स्तर, निम्न प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, प्रयोगशाळा, पदवी, पदविका, डिग्री, प्रमाणपत्र, उत्तीर्ण, उत्तुत्तीर्ण, ग्रेसपास, MMS परीक्षा, NTS परीक्षा, नवोदय परीक्षा, स्कॉलरशिप परीक्षा असे अनेक शब्द हे विशिष्ट क्षेत्राशी संबधित अर्थाचे प्रकटीकरण करतात. यातील काही शब्दांचे अर्थ सामान्य भाषकाला कळतीलच असे निश्चितपणे सांगतायेत नाही.

**क्रीडा क्षेत्र ( क्रिकेट ) :**

क्रीडा क्षेत्र हे फार विस्तृत क्षेत्र आहे. त्यामुळे एका खेळात वापरेल जाणारे शब्द दुसऱ्या खेळात वापरले जातीलच असे नाही. पण काही शब्द मात्र सर्वच खेळामध्ये वापरले जात असतात. क्रिकेट या लोकप्रिय क्रीडाप्रकाराच्याअनुषंगाने या क्षेत्रातील शब्द विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

धावचीत, यष्टीचीत, पायचीत, त्रिफळा, फलंदाज, गोलंदाज, यष्टीरक्षक, क्षेत्ररक्षक, क्षेत्ररक्षण, सामनावीर, मालिकावीर, स्कोरबोर्ड, थर्ड अंपायर, रीव्हुव्ह, स्टेटर्जीकटाईमआउट, लेन्थ बॉल, कव्हर ड्राईव्ह, स्ट्रेट ड्राईव्ह, सिक्सर, फोर, नो बॉल, व्हाईट बॉल क्रिकेट, कसोटी, टेस्ट, ट्वेंटी ट्वेंटी, स्पिनर, पेसर, आर्म बॉलर, चायनामन स्पिनर, रिस्ट स्पिनर, बॉउन्सर, फ्री हिट, गुड्लेन्थ बॉल, डिलिव्हरी, डकवर्ड-लुईस नियम, फॉलो ऑनड. अनेक शब्दांना क्रिकेट या खेळाशी निगडीत अर्थ आहे. दैनंदिन जीवनात यातील बरेचसे शब्द वेगळया अर्थाने वापरले जातात. अथवा बरेचसे शब्द फक्त याच क्षेत्रात वापरले जातात.

**प्रशासन:**

प्रशासन हे सामान्य माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कोणत्याना कोणत्या कारणासाठी प्रत्येकाला प्रशासनाशी निगडीत बाबींमध्ये सहभाग नोंदवावा लागतो. असे असले तरी प्रशासनाची भाषा अथवा शब्दकोश हा सामान्य भाषिकाच्या शब्दकोशापेक्षा वेगळा असतो. त्यातील काही शब्दांचे अर्थ सहजगत्या समजतात पण काही शब्द त्या प्रशासन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तीलाच समजतात त्यांची यादी पुढीलप्रमाणे

अर्ज, विनंती, अनुलेख, अभिलेख, पुराभिलेख, भांडारपाल, कोषागार, अभियंता, दसर, देयक, मंजुरीपत्र, प्रमा(प्रशासकीय मान्यता), धनादेश, नोटीस, दस्त, योजना, सुधारित मान्यता, सामंजस्य करार, पदनामावली, खाते, आदेश, टेंडर, किरकोळ रजा , अर्जित रजा, अभिलेखागार, अधिकारी क्र., माहिती अधिकारी, प्रशासन अधिकारी, वित्त अधिकारी, सांख्यिकीय अधिकारी, ऑडीट, मेमो, माफीनामा, नियुक्ती पत्र, राजीनामा, रुजू अहवाल असे अनेक शब्द हे प्रशासनिक पातळीवर वापरले जातात. काही शब्दाच्या बाबतीत सामान्य भाषिक अनभिज्ञ असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरीलव्यवसाय क्षेत्राखेरीज शेती, धार्मिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रिंट मिडिया, साहित्य, कौटुंबिक नातेसंबंध, आर्थिक क्षेत्र, विविध उद्योग, व्यवसाययातील भाषा वापर हा विशिष्ट प्रकारचा असतो. त्या प्रत्येक भाषा वापराचे विशेष वेगळे असू शकतात. तसेच काही ठिकाणी काही सामान्य शब्द सर्व ठिकाणी सारख्याच अर्थाने वापरले जात असतात.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

**समारोप-**

समाजभाषाविज्ञान हे १९६० नंतर विस्तार पावत असलेले अभ्यास क्षेत्र असले तरी त्याची व्याप्ती इतकी वाढली आहे की आज समाजभाषाविज्ञान हे स्वतंत्र ज्ञानशाखा आहे असे मत अनेक भाषा अभ्यासकांनी नोंदवले आहे. तर काही भाषा अभ्यासकांनी समाजभाषाविज्ञान हेच भाषाविज्ञान आहे असे आपले मत ठामपणे मांडले आहे. समाजभाषाविज्ञानात भाषेचा समाजसापेक्ष अभ्यास करीत असताना भाषिक समूहाच्या भाषाबाबी व विनिमय व्यवहारासाठी वापरला जाणारा शब्दकोश यांचा अभ्यास व त्यांचे विशेष या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. त्यावरूनच आपण भाषिकांच्या भाषा व्यवहाराचे वर्णन तसेच अध्ययन करू शकतो. म्हणूनच समाजभाषाविज्ञानात'लघुक्षेत्रे' या संकल्पनेच्या आधारे भाषिकांच्या भाषाव्यवहाराचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**संदर्भ:**

१)कालेलकर, ना. गो.: भाषा इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन,मुंबई, प्रथमावृत्ती १९६४
२)केळकर, अशोक: मराठी भाषेचा आर्थिक संसार, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद. १९७७
३)मोरे, नंदकुमार : समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी पद्मगंधा प्रकाशन, पुणे,२०१२

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

**समारोप-**

समाजभाषाविज्ञान हे १९६० नंतर विस्तार पावत असलेले अभ्यास क्षेत्र असले तरी त्याची व्याप्ती इतकी वाढली आहे की आज समाजभाषाविज्ञान हे स्वतंत्र ज्ञानशाखा आहे असे मत अनेक भाषा अभ्यासकांनी नोंदवले आहे. तर काही भाषा अभ्यासकांनी समाजभाषाविज्ञान हेच भाषाविज्ञान आहे असे आपले मत ठामपणे मांडले आहे. समाजभाषाविज्ञानात भाषेचा समाजसापेक्ष अभ्यास करीत असताना भाषिक समूहाच्या भाषावापी व विनिमय व्यवहारासाठी वापरला जाणारा शब्दकोश यांचा अभ्यास व त्यांचे विशेष या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. त्यावरूनच आपण भाषिकांच्या भाषा व्यवहाराचे वर्णन तसेच अध्ययन करू शकतो. म्हणूनच समाजभाषाविज्ञानात'लघुक्षेत्रे' या संकल्पनेच्या आधारे भाषिकांच्या भाषाव्यवहाराचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**संदर्भ:**

१)कालेलकर, ना. गो.: *भाषा इतिहास आणि भूगोल*, मौज प्रकाशन,मुंबई, प्रथमावृत्ती १९६४
२)केळकर, अशोक: मराठी भाषेचा आर्थिक संसार, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, १९७७
३)मोरे, नंदकुमार : समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी पद्मगंधा प्रकाशन, पुणे,२०१२